माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/E/००००६५**

**अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
गृह विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
गृह विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि.१८.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१०.२०२३ | २४.११.२०२३ | २८.११.२०२३ | ०५.०१.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.०३.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २८.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १४.१०.२०२३ रोजी सोलापूर पोलिस आयुक्त कार्यालय यांना केलेल्या तक्रारीविषयी माहिती विचारलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थी यांनी दि. २८.११.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांना दि. २४.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती या कार्यासनाच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे ऑनलाईन अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाहीसाठी पोलीस आयुक्त, सोलापूर यांना पाठविण्यात येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०१.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत पाठविलेले उत्तर समर्थनिय आहे असे आदेशित करुन प्रथम अपिल निकाली काढलेले आहे.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०१.०७.२०२५**